N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** सासवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0129 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/04/2025 03:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 04/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/04/2025
**Time From (वेळेपासून):** 12:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/04/2025 **Time (वेळ):** 03:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/04/2025 03:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विर फाटा येथील श्रीनाथ, रसवंती गहातील टेबलावर,ता पुरंदर जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रशांत पोपट खोमणे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राखराडी, पुणे ,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा मु पो जवळाअर्जुन,तापुरंदर, जिपुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7397941105

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोविंद रामेश्वर निर्डे | | | 1. रा मु कचारवाडी,पोस्ट- हिंगणे बु,ताधारुड, जिबीड,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
सासवड पो.स्टे.गु.र.नं.129/2025 भ्रष्टाचार प्रतीबंधक अधि.1988 चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादी- प्रशांत पोपट खोमणे वय 30 वर्षे, रा.मु.पो.जवळाअर्जुन, ता.पुरंदर, जि.पुणे सध्या रा.खराडी, पुणे मोबाईल नंबर 7397941105
आरोपी- गोविंद रामेश्वर निर्डे रा. ओमतारा पश्चिम, जयहिंद हार्डवेअर पाठीमागे, सासवड मुळ रा. मु. कचारवाडी, पोस्ट- हिंगणे बु॥, ता.धारुड, जि.बीड
गु.घ.ता.वेळ व ठिकाण- दि.04/04/2025 रोजी 12.23 ते 15.27 वा. चे दरम्यान मौजे विर फाटा येथील श्रीनाथ रसवंती गृहातील टेबलावर ता. पुरंदर जि. पुणे येथे
सारांश- मी प्रशांत पोपट खोमणे वय 30 वर्षे, रा.मु.पो.जवळाअर्जुन, ता.पुरंदर, जि.पुणे सध्या रा.खराडी, पुणे मोबाईल नंबर 7397941105
मी सुमारे 7 वर्षापासून खराडी, पुणे येथे सी.ए. यांचे कार्यालयात मदतनीस म्हणून कामाला असून कामानिमित्त खराडी येथेच भाडयाने एकटाच रहात असून आठवडयाचे दर शनिवारी व रविवारी माझे मुळ गांवी जवळाअर्जुन येथे येत असतो. माझे मुळ गांव जवळाअर्जुन असून तेथे माझी पत्नी, माझा 3 वर्षाचा मुलगा, माझी आई तसेच माझा मोठा भाऊ हा त्याचे पत्नी व दोन मुलांसह रहात आहेत.

माझे मुळगांव जवळाअर्जुन, ता.पुरदर, जि.पुणे असे असून तेथे आमची वडीलोपार्जित साधारण: 5 एकर शेती आहे. जमीनीचा गट नं.822 आहे. तसेच मी, माझा मोठा भाऊ शेती व दुग्ध व्यवसाय करीत असल्याने आमच्याकडे 15 गायी आहेत. गायींसाठी चा-याची आवश्यकता असते. त्याकरीता मी माझ्-या वरील गट क्रमांकामध्ये मुरघास तयार करण्यासाठी जे.सी.बी च्या सहाय्याने खड्डा खोदला. परंतू जे.सी.बी च्या सहाय्याने खड्डा खोदल्यामुळे शेतीला लागूनच असणा-या वनविभागाचे जागेत माझेकडून दि. 25/03/25 रोजी थोडासा खड्डा जास्त खोदला गेला.

दि. 27/03/2025 रोजी वनविभागाचे वनरक्षक गोविंद निर्डे हे मला कोणीतरी तक्रार केली, असे सांगून मला गुन्हा नोंद करण्याची भिती घालू लागले. म्हणून मी वनविभागाचे हद्दीतील खड्डा तात्काळ बुजवला. त्यानंतरही वनरक्षक गोविंद निर्डे यांनी मला दि. 28/03/2025 रोजी साधारण: 11.59 वा. फोन करुन जेजूरी येथील साकुर्डे गावातील रोडवर भेटण्यासाठी बोलविले. जर तुम्हाला गुन्हा नोंद करुन घ्यायचा नसेल तर दोन लाख रुपये दयावे लागतील, असे सांगितले. मी वनरक्षक गोविंद निर्डे यांना खूप विनंती केली की, माझी आर्थीक परिस्थिती हालाखीची असल्याने मी आपणांस एवढे पैसे देवू शकत नाही, आपण मला माफ करा अगर मी स्वशखुशीने आपल्याला चहापाणी देतो, तेवढे पैसे घ्या. परंतू वनरक्षक यांनी माझे काहीही म्हणणे ऐकले नाही व तुम्हाला तेवढेच पैसे दयावे लागतील, असे मला बजावले. माझेकडे पैसे नसल्यामुळे मी वनरक्षक यंाना सर आपण गुन्हा दाखल करा, माझ्याकडे पैसे नाहीत, असे म्हणून माझे कामाचे ठिकाणी खराडी येथे निघून आलो.

दि. 03/04/2025 रोजी मला पुन्हा वनरक्षक गोविंद निर्डे यांचा 8888408835 या नंबरवरुन आला व काय केल कामाच, तुम्ही मला भेटले नाही, असे म्हणाले. वनरक्षक गोविंद निर्डे◌े मागत असलेले पैसे हे लाच असल्याचे मला माहित असल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे वनरक्षक गोविंद निर्डे यांचेविरुध्द लाचेची तक्रार देत आहे. माझे व गोविंद निर्डे यांचे पुर्ववैमनस्य नाही किंवा आमचेमध्ये कोणत्याही प्रकारचे आर्थीक व्यवहार नाहीत. अशी सविस्तर लेखी तक्रार दि. 03/4/2025 रोजी सायंकाळी लाचचुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली आहे. परंतू त्यावेळी लाचेचे पैसे माझेकडे नसल्याने मी जेवढे जमतील तेवढे पैसे उदया दि. 04/04/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान घेवून येतो, असे सांगितले.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करण्याकरीता दि. 04/4/2025 रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती.भारती मोरे यांनी दोन शासकीय पंच, सापळा पथक हे शासकीय वाहन एर्टीका कार नं. एमएच-12-युसी-



Scanned with CamScanner

4109 हीमधून रवाना झाले. सासवड येथे पोहाचल्यावर माझे व पंच क्र.1 श्री. उत्तम रघुनाथ भारती यांचे पडताळणी कारवाईचे अनुषंगाने निवेदन शासकीय व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत केले.त्यानंतर मी लोकसेवक वनरक्षक गोविंद निर्डे यांना भेटण्याची वेळ व जागा निश्चित करण्याकरीता लोकसेवक यांना माझा मोबाईल नंबर 7397941105 यावरुन लोकसेवक वनरक्षक, जेजूरी श्री.गोविंद निर्डे यांना त्यांचे मोबाईल नंबर 8888408835 यावर 12.08 वा. कॉल केला. परंतू त्यावेळी त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा 12.17 वा. कॉल केला. तरीही त्यांनी माझा फोन उचचला नाही. त्यानंतर 12.22 वा वनरक्षक गोविंद निराडे यांचा माझे मोबाईल फोनवर फोन आला. त्यांना मी सर मी आलोय इकडून कुठे यायचे? तिथे त्या दिवशी भटलो होते, तिथे येवू का? तेव्हा निरडे हो म्हणाले. मी त्यांना बर बर मी एक-दोन-तिन मिनिटात पोहोचतो तिथ, मी गाडीवर आलो आहे, असे म्हणालो. व आमचे दोघांची भेट सासवड येथे आनंद प्रेमाचा चहा येथे झाली. तेथे मी वनरक्षक निर्डे यांना तुम्ही मला सांगा, तुम्ही म्हणाला ना, मला वाटत नाय मी आजच जुळवून आपला विषय फायनल करुन लगेच चालली, म्हणजे टेन्शनच नाय, पुढे तिकडे नकोच आता या हिशोबानेच आलोय मी. त्यावर लोकसेवक श्री. निरडे यांनी होय की, 1 पर्यंत करुन टाका, सांगतो मी अस म्हणाले. तेव्हा मी त्यांना किती असे विचारता, लोकसेवक यांनी एकपर्यंत असे म्हणून हं असे म्हंटले व मला असे म्हणाले त्याचे खाली नाय करणार, आपल्याला सांगायला बर वाटल पाहिजे ना, पाच दहा इकड तिकड पाच पन्नास इकड तिकडे करुन देऊ शकतो, आपण त्यातले अध्र्यातले अर्ध करुन टाकले ती जिम्मेदारी माझी राहिली तुम्ही येवढे करुन दयायची.

तेथे मी लोकसेवक निर्डे यांना एकदाचा हा विषय मिटवूनच टाका, फायनल करा, टेन्शनच नाय, तुम्ही मला ओळखत नाय, मी तुम्हाला ओळखत नाय या हिशोबानेच आलोय मी, असे म्हणता लोकसेवक निर्डे यांनी होय की, एक पर्यंत करुन टाका, त्याला सांगतो मी असे उत्तर दिले. त्यावर मी त्यांना पुन्हा विचारले किती ? त्यावर त्यांनी एक पर्यंत असे उत्तर दिले.त्यावर मी एक लाख असे म्हणता लोकसेवक निर्डे यांनी हं असे म्हणाले.

एकंदरीत दि. 04/04/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक वनरक्षक निर्डे यांनी माझेकडे माझेविरुध्द गुन्हा दाखल न करणेसाठी एक लाख रुपयांची लाचेची मागणी केली. हे निष्पन्न झालेने वनरक्षक निर्डे यांचेबाबतची पुढील सापळा कारवाई दुस-या ठिकाणाहून म्हणजे कुंभारवळण येथून करण्याचे ठरले.

लोकसेवक श्री. गोविंद निर्डे यांनी मागितलेल्या लाचेनूसार लाच रक्कम हजर करणेकरीता मला दिलेल्या सुचनेवरुन मी माइ-या बचतीतले फक्त 24,000/- (चोवीस हजार रुपये ) भारतीय चलनी नोटा लाच रक्कम म्हणून दिल्या. मी हजर केलेल्या नोटांचे नबर कागदावर लिहून घेण्यात आले. लोकसेवक वनरक्षक गोविंद निर्डे यांनी केलेल्या लाचेच्या मागणीनूसार पुर्ण रक्कम माइ-याकडून जमा न झालेल्या रुपये 500 दराच्या नोटा भारतीय चलनी नोटांप्रमाणे दिसणा-या डमी नोटा उपलब्ध करुन सापळा कारवाई दरम्यान नमुद नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानूसार माझेकडील 24.000/- (चोवीस हजार रुपये ) रोख रक्कम व रुपये 76,000/- खेळण्यातील नोटा अशा एकुण रुपये 1,00,000/- (एक लाख) रोख रक्कम सापळा कारवाई दरम्यान वनरक्षक गोविंद निर्डे यांना देण्याचे ठरले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले.

त्यानुसार मला व पंचाना अॅन्थ्रॉसीन पावडरचे गुणधर्म सांगून उपलब्ध केलेल्या नोटांना सापळा पथकातील पो.हवा.जाधव यांनी अॅन्थ्रॉसीन पावडर लावली. त्यानंतर सदरच्या नोटा एका खाकी रंगाचे लिफाफ्यात टाकून त्यावर अॅन्थ्रॉसीन पावडर लावली. सदरचा खाकी लिफाटा माइ-या पॅन्टचे डाव्या खिश्यात ठेवला. त्यानंतर सापळा अधिकारी श्रीमती. मोरे मॅडम यांनी मला सापळा पथकास सापळयाच्या अनुषंगाने सुचना देवून, लोकसेवक निर्डे यांनी लाच स्वीकारल्यास डाव्या हाताच्या शर्टची बाही मुडपण्याचा पुर्वनियोजित इशारा करण्यास सांगितला. त्यानुसार 15.00 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माइ-या फिक्कट गुलाबी शर्टच्या आतील बाजूस बनियनला काखेत लावला. मी वनरक्षक गोविंद्र निर्डे यांची विर फाटा येथील श्रीनाथ रसवंती गृह (उसाचे गु-हाळ) येथे भेट घेण्यासाठी गेलो.

तेथे लोकसेवक निर्डे माइ-याशी अवांतर गप्पा मारल्या. त्यांनी मला शेती कोण करतो, छोटा भाऊ करतो का, याबद्दल विचारणा केली. मी त्यांना म्हणलो बारका बारका आमचा मोठा गायांच्याच इथ नसतोय, त्यावर लोकसेवक निर्डे मला म्हणाले ते मोठा आहे का, त्यावर मी त्यांना म्हणालो हो, ते मोठा आहे, ते घरी आता मी तिकडे असतोय, काय करु देवू का, त्यावर लोकसेवक निर्डे चालतय की असे म्हणाले. त्यावर मी त्यांना आम्हाला जायला, तुम्हाला जायला असे म्हणालो. त्यावर लोकसेवक निर्डे तुम्हाला जायला मोकळ परत असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक निर्डे यांना वर देवू का, खाली देवू अशी विचारणा केली असता, लोकसेवक निर्डे यांनी दया, खालीच दया असे म्हणून टेबलाचे खालून लाचेची रक्कम मागितली. परंतू मी त्यांना माझ्या डाव्या हाताचे पॅन्टचे डावे बाजसू असणा-या खिश्यातून काढून रसवंती गृहात बसलेल्या टेबलाचे वरुन लाचेच्या रक्कमेचे पाकीट दिले.

त्यानंतर वनरक्षक गोविंद निर्डे यांनी माइ-याकडून लाच स्वीकारुन रक्कम त्यांच्या नेसणीस असलेल्या डेनीम



Scanned with CamScanner

जिन्सच्या पाठीमागील बाजूच्या उजव्या साईटच्या खिश्यात ठेवली. लागलीच मी आजुबाजूला उभ्या असलेल्या सापळा पथकास डाव्या हाताच्या फुल शर्टची बाही घडी करुन लाच रक्कम स्वीकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथक यांनी माझेजवळ येवून 15.27 वा. माझेजवळील व्हाईस रकॉर्डर बंद केला. आणि मला लाचेच्या रक्कमेबाबत माहिती विचारली. तसेच लाच रक्कम स्वीकारणारे इसमाबाबत माहिती विचारली. तेव्हा मी त्यांना वनरक्षक श्री.गोविंद निर्डे यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचे दाखवून दिले. त्यानंतर सापळा पथकाने वनरक्षक गोविंद निर्डे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे त्यांच्या पॅन्टच्या खिश्यात असलेली लाचेची रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली. ती लाचेचीच रक्कम असलेबाबत खात्री केली. लाच रक्कम ठेवलेला खाकी लिफाफा, लाचेची रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात कृत्रीम अंधार करुन पाहणी केली असता, त्यावर अॅन्थ्रॉसीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली.

त्यानंतर लोकसेवक श्री.गोविंद निर्डे याचे हात व माझे हातांची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहणी केली असता, आम्हा दोघांच्याही हातावर अॅन्थ्रॉसीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. श्री.गोविंद निर्डे यांनी त्यांचे नेसणीस असलेल्या निळ्या डेनीम जिन्स पॅन्टचे मागील खिश्यावर देखील अॅन्थ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी असल्याचे अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात दिसून आले. लोकसेवक श्री. गोविंद निर्डे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव गोविंद रामेश्वर निर्डे रा. ओमतारा पश्चिम, जयहिंद हार्डवेअर पाठीमागे, सासवड असे सांगितले. तसेच त्यांचे मुळ गांव मु.कचारवाडी, पोस्ट-हिंगणे बु॥, ता.धारुड, जि.बीड असे सांगितले.

तरी दि. 04/04/2025 रोजी 12.23 ते 15.27 वा. चे दरम्यान लोकसेवक वनरक्षक, गोविंद रामेश्वर निर्डे जेजूरी बीट यांनी माझ्याकडून वनविभागाच्या जागेत चुकून पडलेला खड्डा बुजवून देखील माझेवर गुन्हा दाखल करावयाचा नसेल तर रुपये दोन लाखाची लाच दयावी लागेल, अशी लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान दि. 04/04/2025 रोजी तडजोडीअंती रुपये 1,00,000/- ( एक लाख ) लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन रुपये 1,00,000/- ( एक लाख) लाचेची रक्कम विर फाटा येथील श्रीनाथ रसवंती गृहातील टेबलावर बसलेलो असताना स्वीकारली. म्हणून माझी वनरक्षक श्री. गोविंद रामेश्वर निर्डे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
दाखल अमंलदार - पोहवा/1908 कांबळे
तपासी अधिकारी - सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक - भारती मोरे सो.
प्रभारी अधिकारी - पो.नि.अधिकारी सो

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rishikesh bhausaheb Adhikari (I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे सासवड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Rishikesh bhausahel
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API



Scanned with CamScanner